# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 02/01/2024 (मंगळवार) सकाळ


## नागपूर ग्रामीण पोलीस दलाचा 'रेझिंग डे' उत्साहात साजरा

आज दिनांक ०२/०१/२०२४ रोजी नागपूर ग्रामिण पोलीस दलातर्फे 'रेझिंग डे' विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. नागपूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी पोलीस रेझिंग दिनानिमित्य विविध शाळांमध्ये कार्यक्रम राबविले. शाळेतील विद्यार्थ्यांना पोलीस स्टेशनचे कामकाजाविषयी तसेच विविध शस्त्राविषयी माहिती देण्यात आली. कार्यक्रमास विद्यार्थी मोठया संख्येने सहभागी झाले होते. पोलीस स्थानकात असणारी विविध शस्त्रे पाहून विद्यार्थी हरखुन गेले. यावेळी विद्यार्थ्यांनी बंदूक कशी असते, तिची रचना ती कशी हाताळली जाते याबाबत माहिती देण्यात आली. पोलीसांचा जनतेशी संपर्क वाढावा तो अधिक वृद्धांगत व्हावा या उद्देशाने या उपक्रमांचे आयोजन करण्यामागचा उद्देश आहे.























पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर